Postal Reg No. G2/47/CHA-304/2022-23

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• चंद्रपूर (महाराष्ट्र) • वर्ष ०६ वे • RNI : MAHMAR/2018/77866 • मंगळवार दि.१२ सप्टेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो.७७०९३९२०५२ • किंमत २ रु. • ( ई पेपर)


## शब्द वेध

### काय शिकावे ?

फुलांना केवळ फुलायचेच असते
''गळायचे''उद्या म्हणून , आज ते गर्भगळीत
होत नसते...!!
फुलावे... डुलावे...हसावे..जगावे
हेच जगण्यातील ''खरे मर्म''असते.
फुलांसारखे जगणे हेच तर खरे कर्म असते..!!



सुभाष उसेवार
९०११२६२४३९




श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने प्राची दिवाकर चौधरी हिने काढलेली रांगोळी प्राची आर्ट्स ( राजुरा ).मो. ७३५०२८१४५५

# नागपूर येथे 'शासन आपल्या दारी' अभियानाचे आयोजन

## शासनाचे सर्व विभाग एकाच छताखाली आणून शिबिरे घेतल्यास जनतेचा वेळ,पैसा व श्रम वाचतात–ना.फडणवीस





**नागपूर । प्रतिनिधी**

सर्वसामान्यांपर्यंत शासकीय योजना पोहोचविण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. शासनाचे सर्वच विभाग एका छताखाली आणून शिबिरे घेतल्यास लोकांचा वेळ, श्रम आणि पैसा वाचून दिलासा मिळतो. एखाद्या लाभार्थ्याला अनेक योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळाल्यास फायदेशीर ठरते. सर्वसामान्यांच्या 'ईझ ऑफ लिव्हिंग'साठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्रात ११ सप्टेंबरला शासन आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्यमंत्री बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, मोहन मते, टेकचंद सावकर, महानगरपालिका आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती मनोजकुमार सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, स्थानिक नगरसेवक यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते'शासन आपल्या दारी' या योजनेच्या अंमलबजावणीचा उल्लेख करीत उपमुख्यमंत्री म्हणाले की, सुमारे आठ लाख लाभार्थ्यांना या योजनेतून आतापर्यंत नागपूर जिल्ह्यात लाभ मिळाला आहे. २५ लाख लाभार्थ्यांना लाभ मिळाल्यानंतर शासन आपल्या दारी कार्यक्रम मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे. केंद्रात व राज्यात सर्वसामान्यांसाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व स्तरातील नागरिकांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. जिल्ह्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात वयोश्री योजनेचे शिबिर घेण्यात आले. सर्वच प्रकारचे लाभ ज्येष्ठ नागरिकांना या योजनेतून मोफत देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.केंद्राबरोबरच राज्य शासनाच्याही अनेक योजना आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजना ही त्यापैकी एक योजना आहे. यापूर्वी ही योजना काही रेशनकार्डधारकांपुरतीच मर्यादित होती. आता सर्वांना ही योजना लागू झाली आहे. पाच लाखांपर्यंतचे मोफत उपचार राज्य सरकारच्या माध्यमातून होणार आहेत. राज्यभरातील वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये अद्ययावत करीत आहोत. याचाच एक भाग म्हणून नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ५०० तर इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयासाठी ४०० कोटींचा निधी देण्यात आला आहे. खाजगी दर्जाची शासकीय रुग्णालये राहणार असून सर्व अद्ययावत सुविधा उपलब्ध होणार आहेत. पूर्व नागपुरात अनेक विकासकामे सुरू असून या विकासकामांबरोबरच पट्टेवाटपाच्या कामांना अधिक गती देण्याची सुचनाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

# सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच सरकारचे ध्येय–पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पुढील आठवड्यापासून गणरायाच्या आगमनाने सणासुदीला सुरुवात होत आहे. हे दिवस आनंद आणि उत्सवाचे असून या उत्सवात गरीब कुटुंब देखील सहभागी व्हावे, या उद्देशाने राज्यातील १ कोटी ६२ लक्ष कुटुंबांना (५ कोटी लोकसंख्या) आनंदाचा शिधा वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रत्येक सामान्य माणसाच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच सरकारचे मुख्य ध्येय आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.शहरातील जटपुरा गेट येथील स्वस्त धान्य दुकानात गणेशोत्सवनिमित्त आनंदाचा शिधा वाटपाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, भाजपा महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा पुरवठा अधिकारी अजय चरडे, चंद्रपूरचे तहसिलदार विजय पवार, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी पांडुरंग माचेवाड, डॉ. मंगेश गुलवाडे, रामपाल सिंह, अंजली घोटेकर, छबु वैरागडे, रवी आसवानी, संदीप आवारी, संजय कंचर्लावार, शितल आत्राम, रवि गुरनुले, राहुल घोटेकर, रवि लोणकर, स्वस्त धान्य दुकानदार विजय बेले, अनिल बनकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.बाजारभावापेक्षा कमी दराने केवळ १०० रुपयांमध्ये हा आनंदाचा शिधा मिळणार आहे, असे सांगून पालकमंत्री ना.मुनगंटीवार म्हणाले, 'राज्य सरकारने गेल्यावर्षी दिवाळीमध्ये आणि यावर्षी गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गणेशोत्सव व इतर सणांमध्ये आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत, उत्सवाच्या दिवसात प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद देण्याचा हा एक प्रयत्न आहे. राज्य सरकार पूर्ण शक्तीने सामान्य नागरिकांच्या पाठीशी उभे असून नागरिकांनी सुद्धा विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच पदाधिकाऱ्यांनी या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवाव्या.' सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना सणानिमित्त राज्य शासनाकडून 'आनंदाचा शिधा' किट वाटप करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अंत्योदय अन्न योजनेचे १ लक्ष ३९ हजार ७५० लाभार्थी आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील २ लक्ष ७७ हजार २५० लाभार्थी असे एकूण ४ लक्ष १७ हजार लाभार्थी आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्याकरीता ४ लक्ष ४ हजार ४९० आनंदाचा शिधा संच उपलब्ध झाला आहे. या कार्यक्रमाला चांद सय्यद, शीतल गुरुनुले, सविता कांबळे, सचिन कोतपल्लीवार, विठ्ठल डुकरे, दिनकर सोमलकर, अरूण तिखे, शिला चव्हाण, यांच्यासह वॉर्डातील नागरीक उपस्थित होते.





### ८९० कुटुंबांना मोफत आनंदाचा शिधा

जटपुरा वॉर्ड क्रमांक १, रामनगर रोड, चंद्रपूर येथील वॉर्डात जवळपास ८९० कुटुंब आहेत. या सर्व कुटुंबांना मोफत आनंदाचा शिधा देण्यात येणार आहे. ८९० कुटुंबांचे प्रत्येकी १०० रुपये याप्रमाणे एकूण ८९ हजार रुपये यावेळी पक्षाच्या वतीने देण्यात आले. दुकानदारांनी संबंधित कुटुंबांना आनंदाचा शिधा देताना त्यांच्याकडून एकही रुपया घ्यायचा नाही, अशी स्पष्ट सूचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

### पालकमंत्री यांच्या हस्ते वाटप

गणेशोत्सवानिमित्त पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वॉर्ड क्रमांक १ मधील लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. यात लता सिडाम, शहनाज हुसैन, प्रभुदास तेलमासरे, मरीयम शेख, मोहसीन शेख, लता बेले, मिरा तिवारी, संगिता लोखंडे, वासुदेव इटनकर, संजय रामटेके, अशोक शेंडे यांचा समावेश होता.

### गरिबांसाठी विविध योजना

**केंद्र व राज्य सरकारने गरिबांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची सूचना ना. श्री. मुनगंटीवार यांनी केली. संजय गांधी निराधार योजनेमध्ये सुरुवातीला मानधन ६०० रुपये होते. अर्थमंत्री झाल्यानंतर यात वाढ करून १२०० रुपये करण्यात आले. तर आता राज्य शासनाने हे अनुदान १५०० रुपये केले आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा दीड लाखांवरून आता ५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असून नागरिकांना ५ लक्षपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध झाली आहे.**

### असा आहे आनंदाचा शिधा

**चनाडाळ १ किलो, रवा १ किलो, साखर १ किलो आणि पामतेल १ लीटर अशा चार पॅकेटचा हा आनंदाचा शिधा आहे. मशीनवर अंगठा लावताना आपल्या पिशवीत चार पॅकेट असल्याची लाभार्थ्यांनी खात्री करावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.**

# दोन अभियानात सहा लाख इनामी तीन माओवाद्यांस अटक

## गडचिरोली पोलिसांना मिळालं मोठा यश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

विविध हिंसक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या तीन जहाल नक्षल्यांना पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक केली आहे. या तिघांवर प्रत्येकी दोन लाख असे एकूण सहा लाख रुपयांचे बक्षीस होते.सरजू उर्फ छोटू बंडू महाका (२८), मधू उर्फ अनू महारु कुमोटी (२३) दोघेही रा. हलवेर, भामरागड, जि. गडचिरोली व अशोक लाला तलांडी (३०) रा. पासेवाडा, जि. बिजापूर (छत्तीसगड) अशी अटकेतील नक्षल्यांची नावे आहेत.७ सप्टेंबरला विशेष अभियान पथकाचे जवान भामरागड तालुक्यातील ताडगाव परिसरातील जंगलात नक्षलविरोधी अभियान राबवीत असताना सरजू महाका व मधू कुमोटी या दोन नक्षल्यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. २८ फेब्रुवारी २०२३ रोजी विसामुंडी गावानजीकच्या पुलाच्या कामावरील यंत्रसामुग्री या दोघांनी जाळली होती. सरजू महाका हा २०१० मध्ये गट्टा दलममध्ये सहभागी होऊन २०१८ पर्यंत तो तेथे कार्यरत होता. रेंगेवाही, नारगुडा, कुंजेमर्का, मर्दहूर येथील चकमकी तसेच घोटपाडी व पेनगुंडा येथील दोन निरपराध इसमांच्या हत्येत त्याचा सहभाग होता. मधू कुमोटी हा २०१५ मध्ये भामरागड दलममध्ये सहभागी होऊन दोन वर्षे तेथे कार्यरत होता. मुत्तेमकुही, दरबा, कुंडूम इत्यादी चकमकी आणि गोंगवाडी व घोटपाडी येथे झालेल्या दोन इसमांच्या हत्येत त्याचा सहभाग होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.याशिवाय ९ सप्टेंबरला भामरागड तालुक्यातील कियर येथील जंगलातून अशोक तलांडी या नक्षल्यास अटक करण्यात आली. २०१७ मध्ये तो छत्तीसगड राज्यातील सेंड्रा दलममध्ये भरती झाला. परंतु दोन वर्षांपासून तो आपल्या घरी राहून नक्षल्यांना सहकार्य करीत होता. ३० एप्रिल २०२३ मध्ये केडमारा येथे झालेल्या चकमकीत त्याचा सहभाग होता. शिवाय २०१८ मध्ये गोरटूल ते बडाकोक्केर रस्त्यावर स्फोटके पेरण्यात आणि गोरटूल येथील एका इसमाच्या हत्येत तो सहभागी होता. या तिन्ही नक्षल्यांवर पोलिसांनी प्रत्येकी दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.जानेवारी २०२२ ते आजतागायत पोलिसांनी ७० नक्षल्यांना अटक केली आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अहेरीचे अपर पोलिस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



## नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना शासकिय मदत

# आ.समिर कुणावार यांचे हस्ते ११ कुटुंबीयांना धनादेशाचे वितरणं

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट, समुद्रपूर, सिंदि (रेल्वे) विधानसभा क्षेत्रात झालेल्या अवकाळी पावसामुळे ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे जीवितहानीसह मोठे नुकसान झाले, अनेक ठिकाणी विज कोसळल्याने जनावरे मृत झाली, यावेळी शेतकरी व इतरांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.यापैकी समुद्रपूर तालुक्यातील आपत्तीग्रस्त नागरीकांना तसेच मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना असे एकुण ११ कुटुंबियांना शासकिय मदतीचे धनादेश दि.११ रोजी आ. समिर कुणावार यांचे शुभहस्ते वितरीत करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे आयोजन आ. कुणावार यांचे स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी भाजपा जिल्हा महामंत्री किशोर दिघे,भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकुर, भाजपा तालुकाध्यक्ष आकाश पोहाणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. विधानसभा क्षेत्राचे कार्यसम्राट आमदार समिर कुणावार यांनी नैसर्गीक आपत्तीमुळे झालेल्या हानीची वेळोवेळी दखल घेऊन मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांसह ज्यांची गुरे ढोरे दगावली तसेच ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान झाले, या सर्व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तसेच नागरीकांना शासनाचे वतीने आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न केले होते.आज आयोजित कार्यक्रमात नुकत्याच काही दिवसांपुर्वी विज कोसळल्याने मृत पावलेल्या पौर्णिमा गोपाल कासार व ज्ञानेश्र्वर लक्षण जांभुळे या दोन दिवंगत व्यक्तीचे वारसांनाही मदतीचे प्रत्येकी ४ लक्ष रुपयांचे धनादेश वितरीत करण्यात आले.आत्महत्याग्रस्त कुत्तरमारे कुटूंबातील वारसांसही मदतीच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले.




# लोकांकडून नव्हे लोकांसाठी




१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या देशाने डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान स्वीकारले. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या चतुरसुत्रीचा पुरस्कार करणारे आहे. परंतु स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षांनंतर निष्पक्षपणे बघितले असता बाबासाहेबांनी पाहिलेले स्वप्न खरंच वास्तवात उतरले आहे का? आपला देश खरोखरच धर्मनिरपेक्ष राहिला का? आपल्या देशामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता अनुभवायला मिळते काय? हे सगळे भले मोठे प्रश्नचिन्ह उभे ठाकलेले बघायला मिळत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईत ज्या वीर महात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हा त्यांचे ध्येय सर्वसामान्य माणूस इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र व्हावा हे होते. त्यांना वाटत होते की, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गोरे इंग्रज जाऊन या देशातील सर्वसामान्य माणूस खऱ्या अर्थाने सुखी होईल.संपन्न होईल . उपाशीपोटी गरिबाच्या पोटात हक्काचा घास जाईल. परंतु झाले उलटेच.

आज भारतीय स्वातंत्र्याच्या ७६ वर्षानंतरही सामान्य माणसाचे जगणे दुष्कर झाले आहे.माणसे खऱ्या अर्थाने सुखी झालेली बघायला मिळत नाही. गरिबांच्या चेहऱ्यावर निर्मळ आनंद उमटताना दिसतं नाही. लोकशाहीत फरक इतकाच पडला की, गोरे इंग्रज जाऊन जणू काळे आले की काय? असा विचार मनामध्ये येतो. स्वातंत्र्याचा खरा फायदा या देशातील सर्वसामान्य शोषित, पीडित माणसाला मिळालाच नाही. लोकशाहीचा फायदा धनदांडगे आणि हातचालाक लोकांनाच मोठ्या प्रमाणात मिळाला. निःस्वार्थी , मेहनती सामान्य माणसं पुन्हा दारिद्र्याच्या खाईकडे लोटल्या गेली. श्रीमंत अधिक श्रीमंत होत गेले. गरीब अधिक गरीब होताहेत. स्वातंत्र्यानंतर जरी मोठ्या प्रमाणात भौतिक सुखसुविधा वाढल्या असल्या तरी खऱ्या अर्थाने त्या भौतिक सुखाचा फायदा गरिबांना घेताच येत नाही. श्रीमंतांकडे मोठ्या प्रमाणात पैसा असल्यामुळे ते पैशाचा विनियोग करू शकतात. दुसरीकडे गरिबांना उद्याच्या भविष्याची चिंता सतावत असते. या देशांमध्ये काही प्रमाणात सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली असली तरी आर्थिक विषमता दुर्लक्ष करण्यासाठी नाही.

लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य अशी लोकशाहीची व्याख्या केली जाते. हे लोकांकडून चालविलेले राज्य असले तरी ते खऱ्या अर्थाने लोकांसाठी चालविले जाते का? असा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. हे राज्य प्रामाणिकपणे लोकांसाठी चालविल्या गेले असते तर एवढ्या मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झालीच नसती. पैशाने साऱ्या गोष्टी विकत घेता येत नसल्या तरी पैशामुळे अनेक गोष्टी भोगता येत नाही. सारी सोंग करता येतात. परंतु पैशाचे सोंग करता येत नाही हे शाश्वत सत्य आहे.आर्थिक समस्यांपायी अनेकांचा जीव टागणीला लागलेला असतो. घरात समाधानकारक पैसे नसल्यामुळे अनेक पालकांना आपल्या मुलांना चांगल्या पद्धतीचे शिक्षण देता येत नाही. मुलींसाठी चांगल्या पद्धतीने सासर बघता येत नाही. आवडीनिवडी पुरवता येत नाही. चाकरनाम्या लोकांचे काही प्रमाणात ठीक आहे. परंतु शेतकऱ्यांचे फार वाईट हाल सुरू आहे. १२ महिने अहोरात्र कष्ट करूनही शेती पिकेल याची गॅरंटी नाही. सारी उसनवार सुरू आहे.महागाईचा वणवा पेटला आहे.आज ग्रामीण भागामध्ये शेतमालक शेतकऱ्यांपेक्षा शेतमजूर काहीअंशी सुखी आहे. परंतु शेतमालक कंगाल होत चालले आहे. दरवर्षी तोट्यात चालणारी शेती पुढे किती दिवस चालवायची? अशी विवंचना शेतकरी कुटुंबातील सदस्यांना सतावते.



शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण करत लोकप्रतिनिधी बनलेले लोकप्रतिनिधी प्रत्यक्षात सत्ता संपादन करताच गरीब शेतकऱ्यांना विसरून जातात. सत्तेत येण्यापूर्वी मोठ्या मोठ्या गर्जना करणारे निवडून गेल्यानंतर पश्रश्रेष्ठी नावाच्या प्राण्यासमोर एखाद्या शांत मांजराप्रमाणे म्याव म्याव करताना दिसत आहेत. हे चित्र उचित नाही. लोकप्रतिनिधींनी निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळलीच पाहिजे.जो येतो तो आश्वासनांची खैरात वाटतो. मतदारांना प्रभावित करतो. सत्तेत आल्यावर ती आश्वासने त्याला आठवतही नाही. विसरून जातो. या पोकळपणामुळे सर्वसामान्य माणसांचा लोकशाहीवरून विश्वास उडत चालला आहे. कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही अशी अवस्था झालेली आहे.

पुस्तकांत जरी लोकशाहीची अतिशय सुंदर आणि स्मार्ट व्याख्या केली जात असली तरी प्रत्यक्षात मात्र ती सामान्यजनांना दिसत नाही. ही लोकशाही केवळ अभ्यासापूर्ती मर्यादित झाली की काय असे अनुभव येत आहे.आता मतदारांनी सावध होण्याची गरज आहे. आपला कोणी गैरवापर करणार नाही यासाठी सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या मतदारांनी राजकीय लोकांच्या बहकाव्यात न येता प्रामाणिकपणे विचार करून कुठल्याही आर्थिक प्रलोभनांना बळी न पडता खरे आणि प्रामाणिक लोकप्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. त्यासाठी निवडणुकीच्या काळात उमेदवारांकडून मिळणाऱ्या मेजवान्या टाळल्या पाहिजे. आर्थिक लोभ टाळले पाहिजे. जे उमेदवार अशाप्रकारे प्रलोभने दाखवीत असेल त्यांना त्यांची जागा प्रामाणिकपणे दाखवून दिली पाहिजे. एखादा होतकरू आणि सामान्य जनांबद्दल प्रामाणिक तळमळ असलेला उमेदवार जरी गरीब असला तरी त्याला निवडून दिले पाहिजे. कारण पैसे वाटणारे धनदांडगे नेते निवडून आल्यानंतर सर्वसामान्य मतदारांच्या मागण्यांकडे लक्ष देत नाही. आणि का म्हणून द्यावे. मतदार पैशाने विकला जात असेल तर उमेदवारांनाही ती सवय लागलेली आहे. पैसे वाटा, पैसे कमवा. पैशानेच मतदान होणार असेल तर स्वाभाविकच उमेदवार शॉर्टकट निवडतील. सामान्य नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करतील . आता यापुढे मतदारांना स्वाभिमानाने जगायचे असेल. खऱ्या अर्थाने लोकशाही जगवायची असेल तर प्रामाणिक माणसे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिली पाहिजे.

देशात २०२४ च्या निवडणुकीची चर्चा सुरू झालेली आहे. आता नागरिकांनीही आर्थिक प्रलोभनांकडे दुर्लक्ष करून चांगल्या आणि सज्जन शक्तींना निवडून आणणे आवश्यक आहे. असे केले तरच लोकशाही वाचेल. लोकांकडून चालविलेले राज्य पेक्षा लोकांसाठी चालविणारे राज्य अपेक्षित आहे . स्वच्छ चारित्र्य आणि प्रामाणिक प्रतिमा, सामान्य लोकांचा उद्धार करण्याची आंतरिक इच्छाशक्ती ज्या उमेदवारांमध्ये आहे असेच उमेदवार निवडले पाहिजे. निवडणुकीत मतदारांनी एखाद्या राजहंसाप्रमाणे दूध आणि पाणी यातील फरक समजून घेतला पाहिजे.तर निश्चितच लोकांसाठी ही लोकशाही प्रामाणिक राबविणारे नेते निवडून येतील. अन्यथा पुन्हा जर यावेळी भ्रमनिरास झाला तर लोकांचा लोकशाहीवरचा विश्वास हळूहळू कमी व्हायला लागेल. आपल्या पूर्वजांनी मोठ्या परिश्रमाने मिळविलेली ही लोकशाही पुढे खऱ्या अर्थाने राहील की नाही हे सांगता येत नाही. खऱ्या अर्थाने गरिबांचे राज्य यावे. शोषित, पिडीतांचे राज्य यावे असे मनापासून वाटत असेल तर मतदारांनी आपला अमूल्य मतदानाचा हक्क प्रामाणिक बजावला पाहिजे. मतदानाच्या दिवशी मतदानाकडे पाठ न फिरवता स्वजबाबदारीने आणि निःस्वार्थपणे मतदान करायला मतदान केंद्रावर गेले पाहिजे. माझ्या एकट्याच्या न जाण्याने काय फरक पडणार? असा संकोची विचार करीत मतदानाकडे दुर्लक्ष केले तर उद्या निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधीला शिव्या देण्याचा, सरकारच्या नावाने बोटे बोलण्याचा आपल्याला काहीही अधिकार नाही. या देशात एक व्यक्ती, एक मूल्य असे मतांचे महत्त्व आहे. येथे महालात राहणाऱ्यांच्या मताला जेवढी किंमत आहे. तेवढीच झोपडीमध्ये राहणाऱ्या सर्वसामान्य मतदारांच्या मताला किंमत आहे. लोकशाहीने दिलेला हा मौलिक अधिकार प्रामाणिकपणे गाजवला पाहिजे.आपल्या मतदानाची किंमत ओळखून लोकप्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी पार पाडायला पाहिजे. सर्व मतदारांनी आपले मतदानाचे कर्तव्य प्रामाणिक पार पाडले तरच लोकशाही निकोप राहील. आपल्या मताचे महत्व न ओळखून मतदानाचा हक्क बजावला नाही तर कागदावरच लोकशाही वाचेल की काय? भीती वाटते.

# ‘शासन आपल्या दारी’
## नागपूरसाठी २० लाखांचे उद्दिष्ट



‘शासन आपल्या दारी’, या अभियानातून लोकोपयोगी योजनांचा लाभ थेट जनतेच्या घरात पोहोचावा, यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या मोहिमेला नागपूर जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पुढे आले आहे. स्वतः उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मोहिमेसाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा पिंजून काढणे सुरू केले असून नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक लाभार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी प्रशासनाला २० लाख लाभार्थ्यांचे लक्ष्य निश्चित केले आहे.




राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते नागपूर जिल्ह्यात कार्यक्रम घ्यायचा असेल तर २० लाख लाभार्थ्यांपर्यंत आम्ही पोहोचायला हवे, अशी साद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तथा प्रशासनाला घातली आहे. त्यामुळे प्रशासन गतीने कामाला लागले असून लवकरच हे उद्दिष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रत्येक जिल्ह्यातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ दिला जावा, यासाठी जिल्हा, तालुकास्तरावर २ दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, असे उद्दिष्ट या योजनेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाच्या सुरुवातीलाच निश्चित केले होते. त्यावेळी मोजक्या कालावधीसाठी हे अभियान निश्चित करण्यात झाले होते.

कालावधी वाढविल्यानंतर जिल्ह्यात या अभियानाची बांधणी गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अभियानाची पायाभरणी जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये केली आहे.नागपूर जिल्ह्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंगणा, उमरेड, काटोल, नरखेड, रामटेक, मौदा या सहा उपविभागात बैठकी घेऊन जिल्हा पिंजून काढला. त्यामुळे ७५ हजार लाभार्थी उद्दीष्ट जून महिन्याच्या सुरुवातीलाच पूर्ण झाले आहे. तर नागपूर महानगरातील विधानसभानिहाय लाभ पोहोचविण्यासाठी आयोजन सुरू आहे. नुकताच मध्य नागपुरातील मेळावा उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला. अन्य ठिकाणच्या आयोजनासाठी नागपूर जिल्हा प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, जिल्हा परिषद याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बारकाईने नियोजन सुरू आहे. तथापि, या योजनेतून शाश्वत विकासाच्या लाभार्थ्यांची संख्या वाढावी, कायमस्वरूपी रोजगार, घरे, व्यवसाय, नोकरी, रस्ते, पाण्याचे स्त्रोत, सौर ऊर्जेची उपलब्धता, विजेचे कनेक्शन, घरांचे पट्टे, कृषी योजनेतून दीर्घकाळासाठी कामी पडणाऱ्या यंत्रसामुग्रीचे आरोग्य यंत्रणेचा मोफत लाभ, अतिवृष्टी नुकसान भरपाई, जलयुक्त शिवार, अमृत सरोवर, पीएमकिसान, जलजीवन अभियान, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, माझी वसुंधरा अभियान, पांदन रस्ता, रोजगार हमी योजना, सामाजिक अर्थ सहाय्य योजना, गाव तिथे स्मशानभूमी अशा शेकडो कायमस्वरूपी उपयोगी येणाऱ्या योजनांचा लाभ देण्याकडे शासन प्रयत्नशील आहे. काही समस्या या माध्यमातून कायमस्वरूपी सुटाव्यात हा देखील या अभियानाचा उद्देश आहे.

### सामाजिक न्याय विभागाचा वेगळा प्रयोग

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पुढाकारात महाराष्ट्रामध्ये प्रथमच केवळ अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय घटकाच्या शेकडो लाभार्थ्यांना ‘शासन आपल्या दारी’ अभियानाअंतर्गत लाभ देण्याच्या कार्यक्रम जिल्हयात आयोजित करण्यात आला. ‘शासन आपल्या दारी’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले होते. राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी अभियानाचे कौतुक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

या विभागांतर्गत असणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, धनगर घटकांच्या अनेक योजनांच्या माध्यमातून शेकडो लाभार्थ्यांना हा लाभ प्रत्यक्ष दिला. यावेळी सफाई कामगारांच्या वारसदारांना नुकसान भरपाईचे धनादेश वितरीत करण्यात आले. तसेच मार्जिन मनी योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना, रमाई आवास योजना, बचत गटांना मिनी ट्रॅक्टर वितरण, दिव्यांगांना सहाय्यक उपकरणे वितरण, यशवंतराव मुक्त वसाहत योजना, आश्रमशाळेच्या विद्यार्थ्याना टॅब वितरण, प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेंतर्गत गावांना विकास कामांसाठी प्रत्येकी २० लक्ष अनुदान, कन्यादान योजना, अनुसूचित जाती उपयोजना, निवासी शाळा व प्राविण्याप्राप्त विद्यार्थी तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव, आंतरजातीय विवाह योजनेंतर्गत जोडप्यांना प्रोत्साहन रकमेचे वितरण , महात्मा फुले मागासवर्ग मंडळातर्फे व्यावसायिकांना अर्थसहाय्य, स्वाधार योजनेचा लाभ, दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्रांचे, युडीआयडी वाटप आदी योजनांचा लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

### दिव्यांगांसाठी विशेष अभियान

अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, जमाती यांच्यानंतर आता दिव्यांगांसाठी ‘शासन आपल्या दारी’ विशेष अभियान राबविण्यात येणार आहे दिव्यांगांच्या योजना वैश्विक आधार कार्ड प्रमाणपत्र एकाच स्थळी देण्यासाठी जिल्हास्तरीय दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी या अभियानाचा प्रारंभ जिल्ह्यामध्ये २५ सप्टेंबर पासून होणार आहे. जिल्हा परिषदेने यासाठी पुढाकार घेतला असून सामाजिक न्याय विभागामार्फत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

### २५ लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट

नागपूर शहर, जिल्हा मिळून एकत्रित २५ लाख लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्याचे काम शासकीय यंत्रणेने करावे, असे उद्दिष्ट उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर राज्यव्यापी कार्यक्रम जिल्ह्यात घेण्यात येईल, त्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहतील अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

जिल्हा प्रशासनाने या उद्दिष्टाकडे दमदार प्रवास सुरू केला आहे. नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये यापूर्वीच हजारो लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे. येत्या काही दिवसात या अभियाना अंतर्गत गाव पातळीवर देखील शिबिर आयोजित करण्यात येतील. स्वतः उपमुख्यमंत्र्यांनीच वस्तूपाठ घालून दिल्यामुळे प्रशासन गतिशील झाले आहे.

# साहित्याच्या माध्यमातून हिंदी भाषेची सुंदरता समाजा पर्यंत पोहचवा–आ.किशोर जोरगेवार

## कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघाच्या वतीने ‘उडान’ हिंदी दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



हिंदी आपली राष्ट्र भाषा आहे. या भाषेचा मोठा इतिहास राहला आहे. त्यामुळे या भाषेचे जतन करत या भाषेतील साहित्य जपून या साहित्याच्या माध्यमातून हिंदी भाषेची संदुरता समाजा पर्यंत पोहचवा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. रेंजर कॉलेज येथे हिंदी अध्यापक संघाच्या वतीने ‘उडान’ हिंदी दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत. या कार्यक्रमाला चंद्रपूर हिंदी अध्यापक संघाचे राज्य अध्यक्ष डॉ. मिलिंद कांबळे, माध्यमीक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. बानो सरताज काजी, अनिल शिवणकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, हिंदी अध्यापक संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विदर्भातून आलेल्या अध्यापक आणि हिंदी साहित्यिक यांच्यावर हिंदी भाषेचे महत्व प्रत्येक घटका पर्यंत पोहचविण्याची मोठी जबाबदारी आहे. हिंदी ही राज्य भाषा असली तरी ग्रामिण भागात हिंदी भाषेचा हवा तसा वापर केल्या जात नाही. त्यामुळे अशा आयोजनातून यावर चिंतन मंथन करण्याचे काम झाले पाहिजे. अद्यापकांच्या आणि साहित्यिकांच्या माध्यमातून हे काम होणे अपेक्षित असल्याचेही ते यावेळी म्हणाले.हिंदी दिवसा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करत असतांना या भाषेतील साहित्यांवरही आपण प्रकाश टाकला पाहिजे. असे आयोजन गरजचे असून ते नियमित झाले पाहिजे, यात लोकप्रतिनीधी म्हणून शक्य ती सर्व मदत करण्याची आपली तयारी असल्याचे यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमात सेवा निवृत्त शिक्षिका वैशाली मद्दीवार यांनी व्हिडीओच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांच्या संघर्षमय जिवनावर प्रकाश टाकला त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यापक संघ चंद्रपूर जिल्हा कार्यकारणी, वर्धा जिल्हा कार्यकारणी आणि गोंदिया जिल्हा कार्यकारणीच्या पदाधिका–यांची उपस्थिती होती.

# लोहार समाज मंदिर उपलब्ध करून द्या

## लोहार समाज संघटना राजारामचा वतीने माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्याकडे निवेदनातून मागणी

**गडचिरोली । प्रतिनिधी**



अहेरी विधानसभा क्षेत्रातील माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम है अहेरी तालुक्यातील राजाराम खांदला दौऱ्यावर काल गेले असताना राजाराम येथे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या सभेत लोहार समाज संघटना राजाराम च्या वतीने राजाराम येथे लोहार समाज मंदिर उपलब्ध करून देण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ नागपूर संलग्नित लोहार समाज संघटना राजाराम खां. शाखे अंतर्गत राजाराम, खांदला, निमलगुडम, गुड्डीगुडम, नंदीगाव, पुसुकपल्ली, कोडशेलगुडम, कमलापूर, मांड्रॉ, दामरंचा येथील समाज बांधव एकत्र येत असतात मात्र एवढी मोठी समाज एकत्रित होत असताना सामाजिक कार्यक्रम किंवा समाजाचा मेळावा पार पडताना बसण्याचे अनेक समस्या निर्माण होत आहे.एखादी जागा किंवा इमारत भाड्याने घ्यावा लागते त्या करिता समाज मंदिर गरजेचे आहे. समाजाचे केंद्र स्थान म्हणजे समाज मंदिर असते समाज मंदिर हे आपल्या समाजाचे अनेक समस्या दूर करणारी एक वास्तू आहे. लोहार समाज आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागसले असून समाजाचा विकास करण्यासाठी समाज मंदिर आवश्यक आहे.महिलांचे हळदी कुंकू कार्यक्रम असो की समाजाच्या विकासाच्या चर्चा असो समाज एकत्रित आल्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही ही बाब लक्षात घेऊन लोहार समाज संघटना राजाराम च्या वतीने शाखेचे मुख्य सल्लागार शंकर चंदनखेडे, तालुकाध्यक्ष प्रा. विनोद बावणे, विदर्भ संघटक ईश्वर मांडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांना समाज मंदिर उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे. राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी समाज एकत्रित होण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे समस्या चे निराकरण लवकरच करू असे समाजाला आश्वासन दिले आहे.निवेदन देताना अध्यक्ष रमेश बामनकर,उपाध्यक्ष राकेश कोसरे, साईबाबा बामनकर, कार्याध्यक्ष गोपाल चंदनखेडे, युवाध्यक्ष आशिष चंदनखेडे, सचिव दिलीप मेश्राम, कोषाध्यक्ष विश्वास मेश्राम, महिला अध्यक्ष रेणुका बामनकर, महिला सल्लागार अक्कुबाई बामनकर,मंगला बामनकर,देवाजी बामनकर,विठ्ठल बामनकर,सरिता बामनकर,विलास बामनकर,गंगाराम चंदनखेडे,अशोक बामनकर,सुनील बामनकर,रामबाई बामनकर,शोभा चंदनखेडे,नितेश चंदनखेडे, तसेच नंदीगाव,निमलगुडम, गुड्डीगुडम, कमलापूर, खांदला, पुसुकपल्ली, कोडशेलगुडम येथील समाज बांधव उपस्थित होते.

# बालगोपालांच्या उदंड प्रतिसादात श्रीकृष्ण राधा रुपसज्जा स्पर्धा संपन्न

## श्रीकृष्ण राधा हे आपले धार्मिक सांस्कृतिक मानबिंदू : संध्या विरमलवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भगवान श्रीकृष्णाने जन्मापासून संघर्ष बघितला. कधी हार मानली नाही. तत्व आणि भावना याची सांगड घालत, आयुष्य कसं जगावं याचं थेट प्रशिक्षण आपल्या उभ्या आयुष्यातून श्रीकृष्णाने दिले.श्रीकृष्णाला नीट समजून घेतलं की आयुष्याचे पैलू आपोआप उलगडायला लागतात आणि बरेच पडणारे प्रश्नही सुटायला लागतात. श्रीकृष्णाची रूपे अनेक . त्या रुपांच्या माध्यमातून बालमनावर संस्कार व्हावेत व त्यांचे भावविश्व समृद्ध व्हावे म्हणून संस्कार भारती तर्फे दरवर्षी ही स्पर्धा आयोजित केली जाते , असे प्रतिपादन संस्कार भारतीच्या अध्यक्ष संध्या विरमलवार यांनी केले. दि.१० सप्टेंबर रोजी संस्कार भारती चंद्रपूर तर्फे विवेकनगर येथील श्रीराम मंदिर सभागृहात श्रीकृष्ण राधा रुपसज्जा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संध्या विरमलवार बोलत होत्या. यावेळी मंचावर विवेकनगर सेवा समिती कार्यकारिणीचे उपाध्यक्ष देवेंद्र मोगरे , रा. स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक वसंतराव थोटे , स्पर्धेचे परीक्षक प्रशांत कत्तुरवार , प्रशांत नवघरे , चारुशीला पेकडे - येवले , संस्कार भारतीचे जिल्हा मंत्री मंगेश देऊरकर , उपाध्यक्ष डॉ राम भारत , स्पर्धा संयोजक नूतन धवने यांची उपस्थिती होती. गेल्या काही वर्षांत स्पर्धेत राधेचा सहभाग वाढल्याने बालकांना प्रोत्साहन म्हणून यावर्षी श्रीकृष्ण राधा रुपसज्जा असे स्पर्धेचे स्वरूप करण्यात आल्याचे विरमलवार म्हणाल्या.ही स्पर्धा ० ते ५ आणि ६ ते १० या वयोगटात घेण्यात आली. दोन्ही गटात एकूण ४३ स्पर्धकांनी सहभाग



घेतला. यात लहान गटात प्रथम युग फौर , द्वितीय क्रिशिका मेडपल्लीवार , तृतीय श्रिया सावे , प्रोत्साहनपर लावण्या बेलगे, श्राव्या देशपांडे हे विजेते ठरले. मोठया गटात प्रथम किमया सपाटे , द्वितीय चैतन्या ठाकरे , तृतीय अंजली आक्केवार , प्रोत्साहनपर अवनी श्रोते , आराध्या झाडे हे बालक विजेते ठरले.

विजेत्यांना प्रमाणपत्र ,सन्मान चिन्ह व रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.स्पर्धेचा शुभारंभ श्रीमती पूनम झा , पद्मा शर्मा यांनी सादर केलेल्या स्वागत नृत्याने झाला. संस्कार भारती सदस्यांनी ध्येय गीत सादर केले. प्रास्ताविक नूतन धवने यांनी तर संचालन स्वरूपा जोशी यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभापूर्वी प्राजक्ता उपरकर यांनी कृष्ण आराधना नृत्य रुपात सादर केली. आभार प्रदर्शन अपर्णा घरोटे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सचिव लिलेश बरदाळकर कोषाध्यक्ष सुजीत आकोटकर , राज ताटपल्लीवार , पूर्वा पुराणिक आदींनी अथक परिश्रम घेतले. स्पर्धेला बालगोपालांचा लक्षणीय प्रतिसाद लाभला.

## आनंदवनात झाडी शब्द साधकांचा गौरव

# वेदनाधारकांची अनुभूती व नवनिर्मिती साहित्यात यावी - डॉ. विकास आमटे

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील कार्यकर्त्यांनी आनंदवन म्हणजे कुष्ठरोग्यांची सेवा एवढ्याच व्याख्येत समाधान मानलं नाही. आनंदवनात कुष्ठरुग्णांवर उपचार तर झालेच पण कुष्ठमुक्तांनी निरोगी बनून इतरांचीही सेवा करावी हा मंत्र इथे जपला गेला. आणि आता या कामात आनंदवनातील पुढची पिढीही सक्रिय असून नवे प्रयोग करते आहे . वेदना धारकांची अनुभूती व नवनिर्मिती साहित्यात यायला हवी, असे प्रतिपादन डॉ. विकास आमटे यांनी आनंदवनात केले.झाडीपट्टीतील नवसाहित्यिकांकडून बोलीच्या वैशिष्ट्याचे जतन व संवर्धन व्हावे, लिहित्या हाताना बळ मिळावे या हेतूने झाडीबोली साहित्य मंडळ चंद्रपूर जिल्हा शाखेतर्फे झाडी शब्दसाधक पुरस्काराचे वितरण काल आनंदवन येथील शांतिनिकेतन निजबल सभागृहात करण्यात आले होते याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक बंडोपंत बोढेकर होते तर पद्मश्री डॉ . परशुराम खुणे , आचार्य ना.गो. थुटे , आनंदवनचे विश्वस्त



सुधाकर कडू, झाडीबोली साहित्य मंडळाचे जिल्हाध्यक्ष कवी अरुण झगडकर , महिला विभाग प्रमुख प्राचार्य रत्नमाला भोयर, वरोरा शाखाध्यक्ष पंडित लोंढे, मदनराव ठेंगणे, सुभाष उसेवार आदींची उपस्थिती होती.झाडी शब्द साधक पुरस्कार देऊन प्रा. नामदेव मोरे (चंद्रपूर),प्रकाश कोडापे(चिमूर ),जयंत लेंजे (सिंदेवाही),शितल कर्णेवार(राजुरा),सुनील बावणे (बल्लारपूर),मंगला गोंगले(सावली),वृंदा पगडपल्लीवार (मुल),डॉ.अर्चना जुनघरे (जिवती),सुजित हुलके(पोंभुर्णा) ,संगीता बांबोळे (गोंडपिपरी),धनंजय पोटे (ब्रह्मपुरी),महादेव हुलके (कोरपना),वंदना बोढे (भद्रावती),विजय भसारकर (वरोरा) इत्यादींना सन्मानित करण्यात आले तर रमेश बोपचे (आनंदवन), विनोद देशमुख (घाटकुळ), संतोष मेश्राम (ब्रम्हपुरी) यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले तर संधीनिकेतनचे अधिक्षक रवींद्र नलगिंटवार , माधव कौरासे यांचा सेवाकार्याबद्दल सत्कार करण्यात आला. आनंदवनातील सेवाकार्यास माझेकडून सदैव सहकार्य मिळत राहील असे अभिवचन डॉ .खुणे यांनी देत त्यांनी झाडीपट्टीतील रंगभूमीच्या चळवळीवर प्रकाश टाकला. आनंदवनाच्या पावन भूमीत झालेला आजचा हा पुरस्कार वितरण सोहळा ऐतिहासिक असल्याचे मत ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात ना.गो .थुटे लिखित काव्यसंग्रह बंद - संबंध चे लोकार्पण करण्यात आले तर कवी सु .वि. साठे यांच्या गीतांगण या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वरानंदन च्या कलाकारांनी स्वागत गीताचे गायन केले तर झाडी गौरव गीताचे गायन सु.वि. साठे यांनी केले. सूत्रसंचालन दीपक शिव आणि चंद्रशेखर कानकाटे यांनी केले. आभार प्रदर्शन भारती लखमापूरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी चंद्रकला मते, माधव चाफले, धनंजय पारके,माधव कौरासे, गणेश पेंदोर , शिरीष दडमल, जितेश कायरकर, मारुती खिरटकर आदींनी परिश्रम घेतले.

# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार, परिसरात दहशतीचे वातावरण



**गडचिरोली । प्रतिनिधी**

देसाईगंज तालुक्यातील फरी-झरी जंगल परिसरात सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास मोठ्या पट्टेदार वाघाने हल्ला करून एका महिलेला ठार मारल्याची घटना घडली. सदर महिलेला वाघाने जंगलात ओढत नेले असता गावकऱ्यांनी लगेच धाव घेतला मात्र महिलेचा मृत्यू झाला होता.

महानंदा दिनेश मोहुर्ले वय अंदाजे (४८) असे मृतक महिलेचे नाव असून ती शिवराज- फरी मार्गावर फरी तलावाच्या विरुद्ध बाजूला असलेल्या झुडपी जंगला लगत असणाऱ्या स्वतःच्या शेतावर गवत काढायला गेली होती. ती गवत काढण्यात मग्न असतांना अचानक पट्टेदार वाघाने हल्ला केलाव ठार केले. हल्ला होताच महानंदाने प्राणांतिक किंकाळी फोडली. किंकाळीचा आवाज ऐकताच आजूबाजूच्या शेतात असलेले शेतकरी आणि मजूर आवाजाच्या दिशेने धावले. तेव्हा वाघ महानंदाचे शरीर ओढून नेत असल्याचे दिसून आले. लोकांनी मोठमोठ्याने आवाज करीत धाव घेतली असता वाघ पळून गेला. मात्र तोपर्यंत महानंदाचा मृत्यू झाला होता.सध्या शेतातील निंदणी सुरू आहे. तसेच पाऊस पडल्याने पाणी करण्यासाठी व इतर शेतातील कामे करण्यासाठी अनेक शेतकरी बांधव सकाळच्या सुमारास शेतात जातात.मात्र,या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले.दरम्यान वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू केली आहे.

# वरोरा येथे राज्यस्तरीय कवी संमेलन तथा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

सुशिला वाकडे बहुउद्देशीय संस्था निकतवाडा गडचिरोली अंतर्गत सुशिला काव्य विचार साहित्य मंच तर्फे पहिले भव्य राज्यस्तरीय कविसंमेलन १० सप्टेंबर रोज रविवारला नगरभवन कार्यालय वरोरा (बाजार रोड)येथे घेण्यात आले. सुशिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष डॉ.संघर्ष बळीराम सावळे,हिस्ट्री ऑफ इकॉनॉमिक्स स्टुंडंट म्बेसेडर ऑफ स्कॉटलंडडॉ.बा.आं.म.विद्यापीठ,छ.संभाजी नगर.उद्घाटक, प्रसन्नजीत गायकवाड,सुप्रसिद्ध साहित्यिक,समीक्षक स्वागताध्यक्षा शोभा वेले नागपूर, प्रमुख अतिथी म्हणून आचार्य गो.ना थुटे,सुप्रसिद्ध साहित्यिक,समीक्षक वरोरा.प्रा.मनोहर नाईक, सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, नागपूर प्रकाश दुलेवाले सर,सुप्रसिद्ध साहित्यिक,नागपूर सोपानदेव मशाखेत्री, गडचिरोली,डी.बी.ए.विदर्भ प्रमुख, साहित्यिक पत्रकार कल्पना टेंभुर्णीकर, नागपूर,सुप्रसिद्ध साहित्यिका, नागपूर,रामनाथ खोब्रागडे,शिक्षण विस्तार अधिकारी गडचिरोली,प्रकाश खरवडे,अध्यक्ष जिल्हा ग्रामसेवक संघटना,लोकेश शेंडे,ग्रामसेवक वरोरा,सत्कारमुर्ती गोकुलदास वाकडे,अध्यक्ष,सुशिला वाकडे बहुउद्देशीय संस्था निकतवाडा गडचिरोली,अहेतशाम अली,माजी नगराध्यक्ष,वरोरा,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नील मेश्राम चंद्रपूर,कविसंमेलनाचे सुत्रसंचालन नरेंद्र सोनारकर, सुप्रसिद्ध साहित्यिक,पूरोगामी पत्रकार संघ विदर्भ आणि रविंद्र दयानंद राणा, मुंबई, यांनी



केले.सुशिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सामाजिक,शैक्षणिक , साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले यामध्ये गजानन गेडाम,गडचिरोली यांना,समाजभूषण पुरस्कार ,गंगाधर शालिग्राम धुवाधपारे यांना समाजगौरव पुरस्कार, उषा घोडेस्वार,भंडारा,काव्यरत्न पुरस्कार,सरिता गव्हारे, चंद्रपूर,समाजगौरव पुरस्कार,छाया टिकले, चंद्रपूर,रणरागिणी पुरस्कार,कविता गेडाम, गडचिरोली मंगला पेटकर,समाजरत्न पुरस्कार,सुशिला बुद्धभगवान भगत,आल्लापल्ली,समाजगौरव पुरस्कार समिर रामनाथ पिल्लेवान नागपूर,आदर्श शिक्षक पुरस्कार,भास्कर अमृतसागर,धुळे,समाजभूषन पुरस्कार कृष्णा सतिष राठोडकर लातूर,उज्वला वाल्मीक नगराळे,या कार्यक्रमामध्ये संस्थेच्या संस्थापिका प्रियंका वाकडे/शेंडे यांच्या आर्त हुंकार या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले..प्रा.डॉ.संघर्ष सावळे ,औरंगाबाद हिस्ट्री ऑफ इकॉनॉमिक्स स्टुंडंट म्बेसेडर ऑफ स्कॉटलंड यांनी साहित्याचे सामाजिक क्षेत्रात योगदान या विषयावर दर्जेदार आशयसंपन्न, बोधप्रद विचार मांडले.प्रसनजीत गायकवाड,नागपूर यांनी साहित्यिक कसा असावा यावर मौलिक विचार मांडले,प्रा.मनोहर नाईक, यांनी मौलिक मार्गदर्शन केले.प्रकाश दुलेवाले यांनी ,आर्त हुंकार या विषयावर दर्जेदार समीक्षण केले.कार्यक्रमाला नागपूर, औरंगाबाद, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, अकोला, जळगाव , चंद्रपूर, भंडारा,या जिल्ह्यातील एकूण ५० साहित्यिक उपस्थित होते.वरोरा वासी साहित्यिक आणि , औरंगाबाद, नागपूर, अमरावती, गोंदिया, भंडारा, अकोला , जळगाव, चंद्रपूर, गडचिरोली,यवतमाळ यांची अनमोल साथ संमेलनाला लाभली . या संमेलणासाठी संस्थेचे अध्यक्ष गोकुलदास वाकडे ,संस्था उपाध्यक्ष गंगा सपकाळे, संस्था कोषाध्यक्ष रंजीत बांबोळे तसेच संस्था सचिव तथा संस्थापिका प्रियंका वाकडे (शेंडे), प्रभाकर दुर्गे, संस्था सदस्य लोकेश शेंडे, शालूताई वाकडे, रोशन वाकडे, किशोर देवतळे, रोहित देवतळे, या सर्वांनी अथक परिश्रम घेतले.

# गायवाटप घोटाळा : दोषींवर गुन्हा नोंदविण्याची मागणी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

दुधाळ गाय वाटप योजनेत आदिवासींना आलेले अनुदान दुसऱ्या खात्यात वळवून फसवणूक केल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ११ सप्टेंबरला अखिल भारतीय सरपंच परिषदेने बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु करण्यात आले. कुठे गेल्या गाई, कोणी खाल्ली मलाई असा सवाल करुन आंदोलनकर्त्यांनी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अॅट्रॉसिटीनुसार गुन्हा नोंदविण्याची मागणी केली.आदिवासींना आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. भामरागड या अतिदुर्गम तालुक्यात प्रकल्प कार्यालयामार्फत २० लाभार्थ्यांना दुधाळ गायींसाठी प्रत्येकी एक लाख रुपये खात्यात जमा करण्यात आले. पैसे काढल्यावर गायी देण्यात येतील, असे सांगण्यात आले व त्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन पैसे परस्पर दुसऱ्या खात्यात वळते केले. त्यानंतर लाभार्थ्यांना ना गायी दिल्या ना अनुदान दिले, यातून त्यांची फसवणूक झाल्याचा दावा सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष योगाजी कुडवे यांनी केला आहे.या प्रकरणात प्रकल्प कार्यालयातील अधिकारी - कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा कुडवे यांचा आरोप आहे. २०२० ते २०२३ या दरम्यान राबविलेल्या विविध योजनांची चौकशी करुन अधिकाऱ्यांची एसआयटी व एसीबीमार्फत चौकशी करावी, दोषींवर अॅट्रॉसिटीनुसार कारवाई करावी, या मागणीसाठी योगाजी कुडवे, अरविंद देशमुख, राजू गडपायले, धनंजय डोईजड, मधुकर रेवाडे यांनी धरणे आंदोलन सुरु केले आहे.




सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.

A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866

CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com